# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ फॅक्स २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in**


जा.क्र. तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०११-१२/१८० दिनांक :- 7 JAN 2012

प्रति,

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/कराड/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/अवसरी.
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड/पुणे /शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड. /म.रा. हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे / कुसरो वाडीया इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे

विषय :- खाजगी विनाअनुदानित , कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०११-१२/१०२४९ दिनांक २६/१२/२०११.

उपरोक्त विषयास अनसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये आर्थिक मागास वर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे ईबीसी अर्ज तपासणी करते वेळी ज्या संस्थांना शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्क मध्ये अतिरिक्त शिक्षण शुल्क रक्कम ७ टक्के व सहाव्या वेतन आयोगाची रक्कम अशी वाढ दाखविण्यांत आलेली आहे. अशा संस्थांना त्यांना प्राप्त झालेल्या वाढीव शुल्काचे शिक्षंण शुल्क समितीचे शिफारस पत्र पाहून व खात्री करुन सदर संस्थांना ज्या वर्षी ७ टक्के वाढीव शिक्षण शुल्क व सहावे वेतन आयोगाची वाढ दाखविलेली आहे अशा संस्थांना त्याच वर्षी फक्त एकदाच फी वाढ दाखवून ते शिक्षण शुल्क ईबीसीसाठी ग्राहय धरण्यांत यावे. एकदा ७ टक्के वाढ घेतलेली असेल तर पुन्हा ७ टक्के शिक्षण शुल्क वाढ करुन सादर केलेले प्रस्ताव वाढीव शुल्काने मंजूर करण्यांत येऊ नयेत .

(डि.एन.शिंगाडे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- प्राचार्य, सर्व विनाअनुदानित पदविका /पदवी/ अभियांत्रिकी /औषधनिर्माण शास्त्र आर्किटेक्चर/हॉटेलमॅनेजमेंट/पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए यांना माहितीसाठी.

श्री. शिंदे एस.बी.प्रोग्रॅमर यांना माहितीसाठी.